## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ अन्वये आदेश

---

जा.क्र.सनिसा/अ/प्राधिकृत मंडळ /राजासुचेआमवरुसेपस /१७
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,सावंतवाडी
ता.सावंतवाडीजि.सिंधुदुर्ग
दि.२९/११/२०१७

संदर्भ : १ ) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७-अ अन्वये तरतूद
२) संस्था मंजूर उपविधी प्रमाणे कामकाज करीत नसल्याने
३) दि.३/८/२०१७ चे संचालकाचे राजीनामे
४) संस्थेचे दि १८/८/२०१७ चे पत्र.

ज्याअर्थी, रा.जा.सू.चे आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालयीन सेवकांची सहकारी पतसंस्था मर्या.सावंतवाडी ता.सावंतवाडी ता.सावंतवाडी जि.सिंधुदुर्ग हि नोंदणी एसडीजी /एसडीआय//बी.एन.के/(ओ)दिनांक ४/१/१९९० नुसार नोंदणीकृत सहकारी संस्था असून तीचे कामकाज महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम व संस्था पोटनियम यांना अनुसरुन असणे बंधनकारक आहे.

ज्याअर्थी, संस्थेच्या विद्यमान समिती सदस्यांनी राजीनामे दिल्याने समिती अल्पमतात आलेली आहे.

ज्याअर्थी, संस्थेच्या विद्यमान समिती सदस्यांचा पाच वर्षांचा कार्यकाल पूर्ण झालेला नसून .कलम ७३ अअअ (५) नुसार संस्थेच्या पोटनियमाप्रमाणे निवडावयाच्या एकूण १३ जागांपैकी किमान दोनतृतीयांश म्हणजेच ८ इतके सदस्य असणे कायदेशीर असून तेवढ्या संख्येइतके समिती सदस्य नसल्याने समितीची रितसर रचना ( गठित ) होत नाही, असा अहवाल उपरोक्त संदर्भिय क्र.४ पत्राने संस्था सचिव यांनी सादर केलेला आहे.

त्याअर्थी, संस्थंच्या समितीचा पदावधी संपलेला नसताना व समिती अल्पमतात गेल्याने या कारणांसाठी निवडणूक समितीची रितसर रचना ( गठित ) होण्याइतपत / एवढ्या संख्येने समिती सदस्य नसल्याने संस्थेची निवडणूक होवून नवीन समिती पदग्रहण करेतोपर्यंत संस्थेचे कामकाज संस्थेचे कामकाज पाहण्यासाठी श्री.डि.ए.खांडेकर सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था सावंतवाडी मुख्यप्रशासक, व श्री.आर.आर.आरांवदेकर सदस्य यांची प्रशासक मंडळ म्हणून नियुक्ति करणेबाबत पुढीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

## आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे क. ७७ अ (२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी डि.ए.खांडेकर, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सावंतवाडी रा.जा.सू.चे आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालयीन सेवकांची सहकारी पतसंस्था मर्या.सावंतवाडी ता.सावंतवाडी जि.सिंधुदुर्ग या संस्थेवर खालील प्रमाणे प्रशासक मंडळ नियुक्त करीत आहे

१. श्री.डि.ए.खांडेकर सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था सावंतवाडी - मुख्यप्रशासक
२. श्री.आर.आर.आरांवदेकर - सदस्य

वरील प्रमाणे प्राधिकृत मंडळ म्हणून नियुक्ति करीत आहे. प्राधिकृत मंडळ यांनी तात्काळ संस्थेचे व्यवस्थापन हाती घेवून सहा महिन्यांचे आत संस्थेचे कामकाज सुधारुन नवीन समिती कायदेशीररित्या निवडून येण्यासाठी कार्यवाही करावी व कामकाजाचा अहवाल सादर करावा.

हा आदेश माझी स्वाक्षरी व कार्यालयीन मुद्रा नोंद करुन आज दि.२९/११/२०१७ रोजी निर्गमित केला आहे.

(डि.ए.खांडेकर)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था सावंतवाडी

प्रति,
१ )माजी चेअरमन , रा.जा.सू.चे आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालयीन सेवकांची सहकारी पतसंस्था मर्या.सावंतवाडी ता.सावंतवाडी जि.सिंधुदुर्ग
२ )सचिव, रा.जा.सू.चे आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालयीन सेवकांची सहकारी पतसंस्था मर्या.सावंतवाडी
३ ) श्री.डि.ए.खांडेकर सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था सावंतवाडी मुख्यप्रशासक, रा.जा.सू.चे आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालयीन सेवकांची सहकारी पतसंस्था मर्या.सावंतवाडी

२/- आपणांस सूचित करण्यात येत आहे की, सदर आदेशाची नोंद घेवून चार्ज देणे-घेणे याबाबत कार्यवाही करावी व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**प्रत माहितीसाठी सादर :**
१ ) मुख्य कार्यकारी अधिकारी , सिंधुदुर्ग जिल्हा मध्य.सह. बँक लि.शाखा-सावंतवाडी

(डि.ए.खांडेकर)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था सावंतवाडी